SRA:D:\Circulars\Circular.docx


मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे

# कुसरो वाडिया इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे ४११ ००१

फोन नं. (०२०) २६१६४८१४ फॅक्स नं. (०२०) २६१६१३१०


जा.क्र.कुवाइटे/०१/प्रा/कार्या/आस्था/परिपत्रक/२९० दिनांक : 16 MAR 2020

## परिपत्रक :-

संदर्भ -१. तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांचे पत्र क्र. तंशिविकापू/विवि/सर्वसाधारण/२०२०/१३५७ दि.१४ मार्च २०२०

२. तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांचे पत्र क्र. तंशिविकापू/विवि/सर्वसाधारण/२०२०/१३५५ दि.१४ मार्च २०२०

सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३.०३.२०२० पासून लागू केलेला असून त्यातीतल तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

संस्थेतील अध्यापनाचे कामकाज दि.१४ मार्च २०२० पासून दि. ३१ मार्च २०२० पर्यत बंद राहील **मात्र प्रशासकीय व इतर कामकाज नियमित सुरू राहणार असल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कामावर उपस्थित रहावे.**

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की विद्यार्थ्यांना ३१.०३.२०२० पर्यत सुटी दिलेली आहे. सुटी दिलेली असल्याने विद्यार्थ्यांनी अनावश्यकरित्या बाहेर फिरू नये. वसतीगृहामध्ये, त्यांच्या घरामध्ये स्वतःला सुरक्षित ठेवावे. वसतीगृहामध्ये राहणारे जे विद्यार्थी बाहेर गावाहून आले आहेत त्यांनी अनावश्यक बाहेर फिरू नये अन्यथा आपल्या मूळ गावी जावे अश्या स्पष्ट सुचना विद्यार्थ्यांना देण्यात येत आहेत.

सर्व विभाग प्रमुखांनी तसेच शिक्षकांनी सदर सूचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. कोणी विद्यार्थी अनावश्यकरित्या फिरताना आढळल्यास त्याच्या विरूध्द कार्यवाही होवू शकेल याची जाणीव त्यांना करून द्यावी. विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणास्तव संस्थेत बोलावू नये तसेच संस्थेत न येण्याबाबतच्या स्पष्ट सुचना विद्यार्थ्यांना त्यांच्या व्हॉटसअप ग्रुप किंवा इमेल व्दारे देण्यात याव्यात.

CUSROW WADIA INSTITUTE OF TECHNOLOGY PUNE-1

प्राचार्य

प्राचार्य
कुसरो वाडिया इन्स्टिटयुट
ऑफ टेक्नॉलॉजि, पुणे-१

प्रतः

- सर्व विभाग प्रमुख यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
- सर्व सूचना फलक
  श्री. ढाभळे, नि.स. संगणक यांना, संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी.

Scanned with CamScanner